## वादपत्र दुरुस्ती अर्ज निशाणी क्रमांक ४१ खालील आदेश

## (पारीत दिनांक २२.०३.२०२५)

प्रस्तूतचा अर्ज वादीने *दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा आदेश ०६ नियम १७* अनुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादीने कथन केले आहे की, वादीने प्रस्तूत दावा प्रतिवादींविरुध्दा दावा मिळकतीच्या वाटणी व प्रथक ताबा मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तूत दावा प्रलंबीत असताना देखील प्रतिवादी क्र. १ नामे तात्याराव माणिक जगताप यांनी त्यांच्या हयातीमध्ये खरेदीखत दस्त क्र. ३३९४/२०२३ अन्वये दुय्यम निबंधक कार्यालय, औसा दिनांक २५ जुलै २०२३ अन्वये दावा जमिनीपैकी शेतजमीन गट/सर्वे नं. ५९ व क्षेत्र २ हे. ५४ आर ही जमीन वडीलोपार्जित जमिन कसलीही रक्कम न घेता नाममात्र गुलाब रावण माने यांचे नावे करुन दिली आहे. वास्तविक मयत प्रतिवादी क्र. १ यांनी सदर दावा मिळकतीचे खरेदीखत करुन देण्याचा कसलाही कायदेशीर हक्क नसताना देखील त्याने बेकायदेशीररित्या गुलाबराव माने यांचे नावे दावा मिळकत करुन दिली व त्याचा बेकायदेशीर फेरफार करुन घेतला. त्यामुळे वादपत्रामध्ये त्याबाबत दुरुस्ती करणेची कायदेशीर आवश्यकता निर्माण झाली आहे. सदर दुरुस्तीमुळे मुळ दाव्याच्या स्वरुपात कसल्याही प्रकारचा बदल होणार नसल्याचे कथन केले आहे. सबब अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादीने त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. सबब अर्ज त्यांचे म्हणणेविना चालविण्यात आला.

०४. वादीने वादपत्रामध्ये सदर दुरुस्तीमुळे न्यायदानासाठी मदत होणार आहे असे कथन केले आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ याने दावा प्रलंबीत असताना दावा मिळकत हस्तांतरीत केली आहे व त्यामुळे त्याबाबतचा मजकुर व खरेदीदार यास दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. अभिलेखाचे अवलोकन करता, सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही अथवा त्यामुळे

प्रतिवादीच्या हक्कांना बाधा येणार नाही. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१. वादीचा अर्ज **नि.क्र.४१** मंजूर करण्यात येतो.

२. वादीने वादपत्रात प्रस्तावीत दुरुस्ती १४ दिवसांत करुन वादपत्राची एकत्रीत प्रत व हुकूमनाम्यासाठी वादपत्राची दुय्यम प्रत दाखल करावी.

**( श्री. आवटे पी. पी.)**

दिनांकः– २२.०३.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.